# कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी

## मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, जालना

# विकसित कृषि संकल्प अभियान, खरीप - २०२५

# शेळीपालन व कुक्कुटपालन व्यवसाय

### शेळीपालन व्यवसाय :

जालना कृषि विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंद्याची जोड देऊन आर्थिक विकास साधण्याच्या उपक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांनी शेळीपालन व्यवसाय करतांना दिलेले तंत्रज्ञान आत्मसात करावे कारण सतत संकटात असणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीला एक उत्तम जोडधंदा, आर्थिक उत्पन्नाची शाश्वती, शेतीला उत्कृष्ट सेंद्रिय खत मिळण्यासाठी व आरोग्यदायी दुधासाठी हा व्यवसाय आज पुढे येत आहे.

साधारपणे एक शेळी एका वर्षात दोनवेळा पिलांना जन्म देते. उस्मानाबादी शेळ्यांमध्ये एकाचवेळी दोन ते तीन पिल्ल देण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा एकूण १०० शेळ्या पाळल्यास वर्षाकाठी आपणास ४०० पिल्लं मिळतात. ज्यांची किंमत २० लाख रुपये होते. खर्च वजा करून महिना एक ते दीड लाख उत्पन्न मिळण्याचे सामर्थ्य या शेळीपालन व्यवसायामध्ये आहे. बोकडांना मांसआहारासाठी आज मागणी वाढलेली आहे म्हणून आपण या व्यवसायामध्ये उतरलेच पाहिजे.

पारंपारिक शेळी पालन पध्दतीमध्ये अनेक तोटे असून ते अर्धबंदिस्त शेळीपालन पध्दतीमध्ये टाळता येतात. शेळीपालन पारंपारिक पध्दतीने न करता शेळ्यांना निवाऱ्याच्या ठिकाणी चारा, पाणी व फिरण्याची सोय कायम करणे म्हणजे अर्धबंदिस्त शेळीपालन.

उथळ, पाणी न साचणारी जागा गोठ्यासाठी निवडावी, गोठा पूर्व व पश्चिम दिशेमध्येच बांधावा. थंडी, वारा, ऊन व पाऊस इत्यादींपासून शेळ्यांना संरक्षण देणारा सक्षम गोठा बांधावा. मोठ्या शेळ्यांना गोठ्यात प्रत्येकी १.५ चौ.मीटर जागा व याच्या दुप्पट जागा मोकळ्या मैदानात उपलब्ध करावी. गोठ्यामध्ये खाद्य, पाणी व रात्री प्रकाशाची सोय असावी. गोठ्यात आजारी शेळ्यांना, पिल्लांना व गाभन शेळ्यांना वेगळी जागा ठेवावी. गोठ्याच्या बाजूलाच शेळ्यांना वाहनातून उतरवण्यासाठी व चढवण्यासाठी उताराचा धक्का बांधावा. गोठ्याच्या ४०० मीटर दूरवर मृत्यू पावलेल्या शेळ्यांसाठी शवविच्छेदन करण्याची सोय असावी.

### चारा व आहार व्यवस्थापन :

एका एकर बागायती शेतीमध्ये २० ते २५ शेळ्यांचे अर्धबंदिस्त पध्दतीने यशस्वी शेळीपालन केले जाऊ शकते. शेतातील झाडपाल्याचे प्रमाण व शेळ्यांची संख्या यानुसार उन्हाळ्यातील चाऱ्याचे नियोजन करणे अतिशय महत्वाचे ठरते. हिरवा चारा देण्यासाठी मका, बरसीम, लसून घास, चवळी, दिनानाथ गवत, निगीगवत, निल गवत, स्टायलो, मारवेल यांचा वापर करावा. साधारणपणे एकाशेळीला दिवसभरात ५ किलो हिरवा व ३ किलो वाळलेला चारा द्यावा. जनलेल्या व ५ व्या महिन्यातील गाभणशेळ्या यांना दुधवाढण्यासाठी व पिल्लांची वाढ होण्यासाठी २५० ते ३०० ग्रॅम खुराक द्यावा. खुराकामध्ये खनिज मिश्रणाचा वापर आवश्य करावा. हिरव्याचाऱ्यामध्ये ६०% झाडपाल्याचे प्रमाण ठेवण्यासाठी शेतातील बांध, ओढा, नाला, नदी, रस्ता इ. च्या बाजूस बोर, सुबाभुळ, बाभुळ, शेवरी, शेवगा, हदगा, तुती, चिंच, पिंपळ, आपटा, सौंदड, या झाडांची लागवड केल्यास चारा नियोजन करणे सोपे जाते.

### शेळ्यांच्या विविध जाती :

उस्मानाबादी (धाराशिव), कोकणकन्याळ, संगमनेरी, बेरारी, जमुनापारी

### शेळ्यांचे लसीकरण :

जिवाणूजन्य व विषाणूजन्य आजार टाळण्यासाठी शेळ्यांचे लसीकरण करणे अतिशय आवश्यक आहे.

### लसीकरणाचे वेळापत्रक

| रोग | पहिला डोस | नियमित डोस |
|---|---|---|
| आंतरविषार (इंटरोटॉक्सेमिया) | शेळी ४ महिने वयाची असतांना | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी |
| | पिल्लाच्या आईला गाभण असतांना डोस दिला असल्यास, | पिल्लाचे वय ४ महिने असतांना |
| | डोस दिला नसल्यास | पिल्लाचे वय १ आठवडा असतांना व बुस्टर मात्रा १४ दिवसांनी परत द्यावी. |
| घटसर्प | शेळी ६ महिने वयाची असतांना | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी |
| फऱ्या | शेळी ६ महिने वयाची असतांना | दरवर्षी पावसाळ्यापूर्वी |
| खुरकुत | शेळी ४ महिने वयाची असतांना | दरवर्षी उन्हाळ्यापूर्वी |
| देवी (पॉक्स) | शेळी ३ महिने वयाची असतांना | दरवर्षी डिसेंबर महिन्यात |
| सीसीपीपी | शेळी ३ महिने वयाची असतांना | दरवर्षी जानेवारी महिन्यात |
| पीपीआर | शेळी ४ महिने वयाची असतांना | दर ३ वर्षांनी |

### जंतनाशकाचे वेळापत्रक

| अ. क्र. | वय | नियमीत डोस |
|---|---|---|
| १ | ६ महिन्यापर्यंत | प्रत्येक महिन्यात एक वेळा |
| २ | ६-१२ महिन्यापर्यंत | प्रत्येक दोन महिन्यात एक वेळा |
| ३ | १२ महिन्यानंतर | वर्षामध्ये तीन वेळा(उन्हाळा,पावसाळा,हिवाळा) |

### शेळीपालनासाठी शासनमान्य योजना :

१. राष्ट्रीय पशुधन अभियान योजना (एनएलएम-केंद्र शासन)
२. शेळीपालन करीता शेड बांधणी-मनरेगा अंतर्गत योजना (महा.शासन)
३. नाविन्यपूर्ण योजान (१०+१) (महाराष्ट्र शासन)
४. एकात्मिक शेळी-मेंढी विकास योजना (नाबार्ड - महाराष्ट्र शासन)
५. मूरघास युनिट योजना (महाराष्ट्र शासन)
६. कडबा कुट्टी यंत्र पुरवठा योजान (महाराष्ट्र शासन)
७. राष्ट्रीय कृषि विकास अंतर्गत योजना (महाराष्ट्र शासन)
५. जिल्हा पशुसंवर्धन विभागा अंतर्गत योजना.

## कुक्कुटपालन व्यवसाय ओळख व महत्व :

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या नविन पिढी समोर बेरोजगारी, वातावरण बदल व अवेळी पाऊस तसेच जेमतेम असलेली उपजाऊ शेतजमीन ई. आव्हाने आज 'आ' वासून ऊभे आहेत. या परिस्थीतीत शेतकऱ्यांनी शेळीपालन, कोंबडीपालन सारख्या शेतीपूरक व्यवसायात उतरणे गरजेच बनल आहे. यासाठी मुक्त संचार कोंबडीपालन हा देखील रोजगार निर्मीतीचा उत्तम मार्ग ठरू शकतो. पूर्वी ग्रामीण भागात मुक्तपणे ऊकीरड्यावरती कोंबड्या पाळल्या जायच्या, यातून एका कुटूंबाच्या आहाराची सोय व्हायची परंतू यात आजाराची जोखीम जास्त असल्याने व असमतोल आहारामुळे कोंबड्याची मरतूक जास्त होत असे. अंडी व मांस निर्मीती करीता हा व्यवसाय महत्वाचा आहे यामुळे माणसांना उच्च प्रथिनयुक्त पौष्टीक आहार मिळतो. अंडी तर सर्वात स्वस्त दरात मिळणारे एकमेव प्रोटीन बाजारात उपलब्ध आहे, शिवाय त्यात भेसळही करता येत नाही.

आपल्या राज्यात शेजारील राज्यामधून अंडी मागवले जातात. रोजची महाराष्ट्राची अंड्याची गरज २.२५ कोटी एवढी/दिवस असून मात्र दररोजचा उपलब्ध पुरवठा फक्त १.२५ करोड एवढा आहे. तरी फक्त ३३ अंडी/वर्षे/माणसी आज उपलब्ध आहेत. याऊलट आय.सी.एम.आर. च्या शिफारसी नुसार आजची एकूण गरज १८० अंडी/वर्षे/माणसी आहे, यासाठी कुक्कुटपालन व्यवसाय वाढवणे खुप महत्वाचे आहे.

पारंपारीक कोंबडी पालनाचा हेतु फक्त घरापुरते अंडी व मांस मिळावे एवढाच असतो परंतु जर कोंबड्या एका विशीष्ट क्षेत्रामध्ये निवऱ्यास ठेवल्या तर आपणास ही संख्या शंभर–दोनशे किंबहुना त्याहून अधिकही ठेवाता येते तसेच यामुळे त्यांना संतुलीत अहार देणे, लसीकरण करणेही शक्य होते यालाच आपण अर्धबंदिस्त कुक्कुटपालन किंवा सुधारित मुक्त संचार कुक्कुटपालन म्हणतो. या व्यवसायात कोंबड्यांची मरतूकही कमी होते. मुक्त संचार कुक्कुटपालन पद्धतीने शेतकरी आपल्या शेतरातील फळबागेत जसे अंबा, सिताफळ, पेरू, चिंच, मोसंबी, द्राक्ष इ. फळपिकांच्या बागेत एका विशीष्ट निवडलेल्या जागेत वर्षभर (अंडी) किंवा हंगामी कोंबडीपालन (मास निर्मिती) करण्यास वाव आहे.

गावरान कोंबड्या पिल्लं सांभाळल्याने कमी अंडी देतात तसेच बाजारात विक्री योग्य बनन्यासाठी त्यांना सहा महिने लागतात. यात मरतूकही जास्त होते, ऊलट सुधारीत कोंबड्यांची निवड केल्यास मरतूकही कमी व जास्त अंडी उत्पादन मिळते आणि तीन ते साढेतीन महिन्यातच त्या बाजारात विक्रीला येतात.

## खाद्य व्यवस्थापन :

ग्रामीण भागातील कोंबड्यांना संतुलीत आहार न मिळाल्याने त्या कमी वजनाच्या व कमी अंडी देणाऱ्या कोंबड्या बनतात तसेच पिल्लांची वाढही योग्य रितीने होत नाही परिणामी त्यांची मरतूक जास्त होते. या सर्व बाबी टाळण्यासाठी कोंबडीपालनामध्ये संतुलीत आहाराला अतिशय महत्व दिले जाते. कोंबड्यांना ग्रामीण भागात नुसते धान्याचे दाणे (ज्वारी, गहू, तांदुळ) खाऊ घातल्यामुळे कोंबड्यांना कुपोषण सारख्या संकटांना सामोरे जावे लागते. यासाठी कोंबड्यांना दररोज संतुलीत आहार वयाच्या वाढीनुसार पुरवला जातो. लहान पिल्लांना प्रिस्टारटर, वाढणाऱ्या कोंबड्यांना गावरान स्टारटर व मासल कोंबड्यांना गावरान फिनीशर आदी प्रकारचे खाद्य द्यावे लागते. जर आपण कोंबड्या अंडी उत्पादनासाठी वाढवत असू तर ६ आठवड्यानंतर त्यांना ग्रोवर नावाचे खाद्य द्यावे आणि अंडी सुरू झाल्यानंतर लेअर खाद्य (फेज–I, II, III) द्यावे. कोंबडीपालनात खाद्यावरील खर्च हा सर्वात जास्त (७०%) असतो. हा खर्च कमी करण्यासाठी सुधारीत जातीच्या कोंबड्यांना आपण २०% पालेभाज्या व २०% अझोला दररोजच्या आहारामध्ये दिला तर आपला खर्च मर्यादित ठेवू शकतो. भाजीपाल्यामध्ये कोंबड्यांना पालक, मेथी, कोबी तसेच मेथी घास आपण देऊ शकतो यामुळे कोंबड्यांना तंतूमय घटक मुबलक प्रमाणात उपलब्ध होतात व गुणवत्तापूर्ण अंडी मिळण्यास मदत होते.

## कोंबड्यांच्या विविध जाती :

ग्रामप्रिया, आरआयआर, गिरीराजा, वनराजा, कावेरी, कडकनाथ, श्रीनिधी, राजश्री इत्यादी

## मुक्त संचार कोंबड्यांचे अर्थशास्त्र (१०० नग) :

देशी व सुधारीत जातीच्या कोंबड्या एकत्र पाळल्यामुळे आपणास पिल्लं निर्मीतीचा व्यवसाय करता येतो. सुधारीत जातीच्या कोंबड्या अंडी जास्त देतात व देशी कोंबड्या अंडी उबवण्याचे व चांगल्या दाई म्हणून काम करतात. वर्षभरात आपण मिळणाऱ्या अंड्यापासून अंडी उबवून दोन वेळा पिल्लं निर्मिती केल्यास अंडी व पिल्लं विक्रीचा व्यवसाय आपणास फायद्याचा ठरतो. या व्यवसायाचे अर्थशास्त्र खालील प्रमाणे आहे.

### अ) एकाच वेळी लागणारा खर्च

| | |
|---|---|
| शेड बनवणे (२०० चौ.फुट) | – रू. ५०,०००/– |
| संरक्षण जाळी खर्च (१००० चौ.फुट) | – रू. ३०,०००/– |
| कोंबड्यां खरेदी खर्च (१०० नग) | – रू. ३०,०००/– |
| साहित्य / भांडे खर्च | – रू. १०,०००/– |
| इतर खर्च | – रू. १०,०००/– |
| **एकूण** | **– रू. १,३०,०००/–** |

### ब) दरवर्षी लागणारा खर्च

| | |
|---|---|
| कोंबडी खाद्य खर्च | – रू. ६०,०००/– |
| औषधी व लसीकरण खर्च | – रू. १०,०००/– |
| **एकूण** | **– रू. ७०,०००/–** |
| **एकूण खर्च (अ + ब)** | **– रू. २,००,०००/–** |

### क) वार्षीक उत्पन्न

| | |
|---|---|
| अंडी उत्पादन (२०००० नग/वर्ष) | – रू. २,००,०००/– |
| पिल्लं निर्मिती (३००० नग/वर्ष) | – रू. ७५,०००/– |
| **एकूण उत्पन्न** | **– रू. २,७५,०००/–** |
| निव्वळ नफा : प्रथम वर्ष | – रू. ७५,०००/– |
| : द्वितीय वर्ष | – रू. २,०५,०००/– |







## लसीकरण वेळापत्रक

| पक्षांचे वय (दिवस) | रोग | लस मात्रा | पध्दती |
|---|---|---|---|
| ०१ | मरेक्स | ०.२ मि.ली | S/C |
| ०७ | राणीखेत | १ थेंब | डोळ्याद्वारे |
| १४ | गंम्बोरो | १ थेंब | डोळ्याद्वारे |
| २१ | राणीखेत | १ थेंब | डोळ्याद्वारे |
| ४२ | देवी | ०.२ मि.ली. | S/C |
| १०० | देवी बुस्टर | ०.२ मि.ली. | S/C |
| १२६ | राणीखेत ($R_2B$) | ०.५ मि.ली. | S/C |
| १४० | गम्बोरो | ०.५ मि.ली. | S/C |

**शेळ्या व कोंबडी पिल्लं उपलब्धता :**

विविध जातीच्या शेळ्या व कोंबडी पिल्लं मिळण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी, जालना येथे संपर्क करावा.

* लेखन व संकलन *

**डॉ. एच. एम. आगे** (विषय विशेषज्ञ, पशुवैद्यकशास्त्र)

मो. ९०२८२५४९५०